



Title Code- MAHMAR-51647

# दैनिक जनसंचलन

निडर निर्भिड

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Mob- 9822720784

Email- jansanchlan@gmail.com






वर्ष ३ रे | अंक : ७०७. वा | बुधवार | दि. १३ मार्च २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३रुपये




# हे खासदार झाले अन् जिल्हा विकासात ५० वर्षे मागे गेला!...

## खासदार जाधवांच्या सासुरवाडीत संदीप शेळकेंचा हल्लाबोल

**जनसंचलन /मेहकर**

मागच्या १५ वर्षात जिल्ह्याचा सत्यानाश झाला. विकासाच्या नावाने जिल्ह्यात बोंब आहे. केंद्राच्या योजना गल्लीत उतरल्याच नाही. इथे केवळ ठेकेदारांच हित जोपासल्या जाते. हे खासदार झाले अन् जिल्हा विकासाच्या बाबतीत ५० वर्षे मागे गेला असा घणाघात संदीप शेळके यांनी खासदार जाधवांचे नाव न घेता केला. दि,१२ मार्चला सकाळी वन बुलडाणा मिशनची परिवर्तन रथयात्रा लोणी गवळी येथे पोहचली,यावेळी संदीप शेळके बोलत होते. पुढे बोलतांना संदीप शेळके म्हणाले की, बुलडाणा जिल्ह्याला कुणी मागास- लेलं म्हणत तेव्हा आम्हाला प्रचंड वेदना होतात. जिल्ह्यात सगळं काही आहे मात्र राजकीय इच्छाशक्ती अभावी जिल्ह्याचा विकास खुंटला असल्याचे ते म्हणाले. मेहकर आणि लोणार तालुक्यात तर प्रचंड समस्या आहे. १५ वर्षे खासदारकी १५ वर्षे आमदारकी , राज्यमंत्री पद एवढं उपभोगुन देखील विकास का करता आला नाही असा सवालही याव- ळी शेळके यांनी केला. जनतेने आपल्याला लोकसभेची संधी दिल्यास प्रत्येक तालुक्यात एमआयडीसी, शेतकऱ्यांना वीज, पाणी, तरुणांना रोजगार, शेतीवर आधारीत प्रक्रिया उद्योग, महिला सक्षमीकरण, जिल्ह्याचे पर्यटन हे मुद्दे आपल्या अजेंड्यावर रा- हतील असेही संदीप शेळके म्हणाले.. वन बुलडाणा मिशनच्या परिवर्तन रथयात्रेला मेहकर तालुक्यात प्रचंड प्रतिसाद मिळतोय. गावोगावी यात्रेचे




दमदार स्वागत होत आहे. मेहकरची जनता प्रस्थापितांना कंटाळली आहे, इथल्या जनतेने सगळा जवळून अनुभव घेतला त्यामुळे जनतेने आता परिवर्तनाचा संकल्प केला आहे असे संदीप शेळके म्हणाले. अंजनी, आंधृड, लोणी गवळी, वरूड, घाटबोरी, इसवी, पांगरखेड, विठ्ठलवाडी, बेळगांव, डोणगाव ना- गापूर या गावांत १२ मार्चला परिवर्तनाचा संकल्प करण्यात आला.

# भोन येथील प्राचीन बुद्ध स्तुप वाचवीण्यासाठी महामोर्चात सहभागी व्हा -सुजित बांगर यांचे आव्हान

**जनसंचलन/बुलढाणा**

बुध्दिष्ट इंटरनॅशनल नेटवर्क द्वारे बुलढाणा जिल्हाधिकारी कार्यालयावर १७ मार्च रोजी विशाल धडक महामोर्चा होत आहे भोन येथील प्राचीन मौर्यकालिन बुद्ध स्तुप वाचवण्यासाठी संवर्धन व उत्खनाबाबत जिल्हाधिकारी बुलढाणा यांना कळविले असता अध्यापही कोनतेच लेखी ऊत्तर प्राप्त झाले. नाही. तसेच सम्राट अशोक काळात ८४ हजार बौध्द स्तुपांपैकी एक अतिषय महत्वाचा स्तुप संग्रामपुर तालुक्यातील भोन येथे सापडला असून ह्या संदर्भात २००६ मध्ये डेक्कन कॉलेजचे डॉ. देवतारे यांनी संशोधन करून तो जगासमोर आन- ला. यासंदर्भात सरकार कडे बुध्दिष्ट इंटरनॅशनल संघटनेकडून पाठपुरावा करने सुरू आहे. तसेच २०१९ मध्ये शेगांव येथे राज्यस्तरीय भोन स्तुप वा- चवा महामेळावा घेण्यात आला असता तत्कालीन महाराष्ट्र राज्य सरकारने ५०९ कोटी रूपये निधी भोन स्तुप संवर्धन उत्खनन करण्यासाठी घोषीत केला होता तो अद्यापही खर्च झाला



नाही ऊलट जिगाव प्रकल्प धरनाचे काम झपाट्याने होत आहे.त्यामुळे भोन स्तुप नष्ट होवू शकतो हा संशय आहे कारण येना-या पावसाळ्यात जर पाण्याने मुसुंडी मारली तर या ठिकाणी पाणि हे स्तुपात शिरन्याची १००% संधी आहे परंतू संध्याची शासकीय प्रशासकिय यंत्रना दुर्लक्ष करित असल्याचे दिसून येत आहे. हा स्तुप गेल्या २००२ पासून जगासमोर आला आज २०२४ ऊलटून सुध्दा तब्बल २२ वर्षे झाली तरीही सरकार याकडे जानीवपूर्वक दुर्लक्ष करत आहे हे यावरून सिध्द होते. तरी या घटनेचा तिव्र निषेध करीत बुध्दिष्ट इंटरनॅशनल नेटवर्क च्या वतीने १७ मार्च २०२४ रोजी घटनेचा निषेध व सरकारचे डोळे उघडण्याकरीता भोन स्तुप वाचवीण्यासाठी संवर्धन,संरक्षण, उत्खनन होण्यासाठी हा राज्यस्तरीय महामोर्चा होत आहे. असे सुजित बांगर यांनी अकोला येथील शासकीय विश्रामगृहात पार पडलेल्या बैठकीत बोलत असतांना बहुजन समाजबांधवाना महामोर्चात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

# नाशिक येथे राजेश टारपे यांना समाज भूषण पुरस्काराने सन्मानित

**जनसंचलन /बुलढाणा**




आम्ही सुवर्णकार मंडळ प्रणित, परोपकार फाऊंडेशन नाशिकच्या वतीने कर्तबगार व्यक्तींना/ संस्थाना दर वर्षी कै. ग. भा. द्वारकाबाई उत्तमराव अष्टेकर यांच्या स्मरणार्थ गणेश शेठ उत्तमराव अष्टेकर यांच्या वतीने समाजभूषण पुरस्कार देण्यात येते. आदिवासी कला शिक्षण संस्थेच्या माध्यमातून महाराष्ट्रातील आदिवासी ग्रामीण भागातील पहिली अंध विद्यालय बोधडी ता. किनवट ही शाळा चालविण्यात येते,या शाळेच्या माध्यमातून राजेश टारपे संस्थेचे अध्यक्ष या नात्याने आदिवासी ग्रामीण भागातील अंध मुलांना दृष्टी दाखविण्याचे काम मागिल दहा वर्षापासून सातत्याने करत असून शेकडो अंध मुलांना शिक्षण देऊन स्वत:च्या पायवर उभा करण्याचे काम करत आहेत तसेच सदरील शाळेचे संगीत क्षेत्रात फार मोठे नाव असून मागिल वर्षी शाळेला महाराष्ट्रातील उत्कृष्ट संगीत केंद्र म्हणून अखिल भारतीय गंधर्व मंडळ मुंबईकडून पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला होता.,तसेच संस्थेच्या माध्यमातून किनवट बहुल आदिवासी भागात आदिवासी दलित मागासवर्गीय मुलींच्या शिक्षणासाठी सामाजिक न्याय विभागाचे मागिल वीस वर्षा पासून निवासी वसतिगृह चालवीतात त्यामुळे गरिबातील गरीब मुलींना राहण्याची व जेवणाची सोय मिळाल्यामुळे आता पर्यत शेकडो मुलींना शिक्षणाच्या प्रव्हात अणण्याचे काम करत आहेत. बुलडाणाजिल्ह्यात मागिल पंचवीस वर्षापासून जिल्हा रुणालयात शासकीय नौकरी करत असताना आदिवासी दलित मागासवर्गीय समाजाची सेवा करत आ- हेत. अखिल भारतीय आदिवासी विकास परिषदेच्या माध्यमातून दऱ्या खोऱ्यात राहणाऱ्या आदिवासी समाजाला शासकीय योजना मिळवून देणे त्यांच्यावर होणाऱ्या अन्याय अत्याचार झाला तर न्याय मिळवून देण्याचे काम करत आहेत.सदरील कामाची दखल घेऊन नाशिक येथील सामाजिक क्षेत्रात कामकरणारे आम्ही सुवर्णकार मंडळ प्रणित परोपकार फाऊंडेशन नाशिक यांनी यावर्षीचा समाज भूषण पुरस्कार बुलडाण्याचे आदिवासी कला शिक्षण संस्थेचे अध्यक्ष राजेश टारपे यांना ११ मार्च रोजी श्री संत नरहरी कुलथे मंगल कार्यालय नाशिक येथे सन्मान चिन्ह देऊन गौरव करण्यात आला. कर्यक्रमाचे अध्यक्षस्थानी गणेशशेठ अष्टेकर होते प्रमुख पाहुणे माननीय कैलास शेठ भांबुर्डेकर गोपाळशेठ कुलथे , इंजि. शाहुशेठ,मधुकर शेठ टाक, भगवानसेठ शहाणे आदी मान्यवर उपस्थित होते तसेच या कार्यक्रमाच्या आयोजक श्रीमती मीनाताई सोनार संस्थापक अध्यक्ष तसेच मा.सुभाष भाऊ बोराडे, रमेशराव नागरे, कविताताई पाटील,संजय बोडके,दत्ताशेठ दहीवाळ शिवाजीआण्णा लोणार,बाळासाहेब बोराडे तसेच प्रसिद्धीप्रमुख श्री गोकुळ भाऊ लोखंडे, श्रीमती मीनाताई, पुष्पाताई कुलथे अंजलीताई महाले, सविताताई दहिवाळ,आधी मान्यवरांनी हा कार्यक्रम आयोजित केला होता,

बुलडाणा शहर व परिसरातील रुग्णांच्या सेवेसाठी अत्याधुनिक सेवा सुविधांनी सुसज्ज असे
डॉ. ऋषिकेश अशोक निकम यांचे ....
निकम ॲक्सीडेंट व ट्रॉमा सेंटर
पत्ता: डॉ. व्यवहारे हॉस्पिटल(पहिला मजला), जांभरुण रोड, बुलडाणा
मो. 9923191666
* उपलब्ध सुविधा *
- कृत्रिम सांधे प्रत्यारोपण
- अति जोखीमीचे हाडांची शस्त्रक्रिया
- लहान बाळांचे जन्मजात वाकडे पायावर उपचार (क्लबफूट)
- संधीवातावर उपचार
- गुडघ्याची दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया
- फ्रॅक्चरवर अत्याधुनिक तंत्रज्ञानाद्वारे उपचार व शस्त्रक्रिया
- मणक्यातील आजारावर उपचार
- दुर्बिणीद्वारे सांध्याची तपासणी व शस्त्रक्रिया
- कंबरेचे व मानेचे दुखणे
- पायातुन व हातातून तीव्र वेदना, मुंग्या येणे, अधू होणे यावर उपचार
डॉ. ऋषिकेश अशोक निकम
M.B.B.S, D-ORTHO (Mumbai)

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

# प्रतापरावांकडून उडाला जिल्ह्यात विकासाचा बोजवारा...

## भाजपमध्ये नाराजी, भाईजींसारख्या विकासपुरुषाची वाढली गरज...



जनसंचलन /बुलढाणा

गेल्या १५ वर्षांपासून जिल्ह्याचे लोकसभेत नेतृत्व करणारे प्रतापराव जाधव यांच्याकडून विकासाचा अक्षरशः बोजवारा उडाला आहे. प्रतापरावांनी जिल्ह्याच्या विकासासाठी काय केले, हे खुद्द प्रतापरावांचे जवळचे कार्यकर्ते देखील सांगू शकणार नाहीत. त्यामुळेच भाजपमध्येही प्रतापरावांप्रति गेल्या अनेक वर्षांपासून नाराजीचा सूर आहे. तसेच यंदा राज्यात भाजपच्या वाट्याला जास्त जागा येणार असल्या कारणाने बुलढाणा लोकसभेची जागा आपल्याला मिळावी, यासाठी भाजपकडून जोरदार फिल्डिंग लावण्यात आली आहे. अशातच जिल्ह्याचा विकास करावयाचा असेल, तर बुलढाणा अर्बनचे संस्थापक राधेश्याम चांडक उर्फ भाईजी यांच्यापेक्षा मोठे नाव कोणतेही असू शकत नाही. त्यामुळे भाजपमधील एक गट भाईजींसाठी सक्रिय असल्याचे दिसून येत आहे. प्रतापराव हे सर्वप्रथम १९९५ साली मेहकरचे आमदार म्हणून विधानसभेच पोहोचले होते. पुढच्या काही वर्षांमध्ये ते शिवसेनेचा जिल्ह्याचा प्रमुख चेहराच बनून गेले. संपर्कप्रमुख म्हणून त्यांनी बरेच वर्षे काम पाहिले. एकीकडे पक्षात प्रतापरावांचे वजन वाढत असताना लोकसभेत म्हणावा तसा त्यांचा आवाज दुमदुमला नाही. प्रतापराव १५ वर्षे खासदार आहेत खरे, परंतु विकासाच्या नावाने जिल्ह्यात बोंबच आहे. शिवाय प्रतापरावांचा सर्वांत मोठा प्रॉब्लेम आहे तो जनतेशी आणि मित्रपक्षांच्या कार्यकर्त्यांशी त्यांची कनेक्टिव्हिटी. बुलढाणा लोकसभा मतदारसंघाचा आवाका फार मोठा आहे. १३ तालुक्यांचा हा लोकसभा मतदारसंघ. परंतु प्रतापरावांची कनेक्टिव्हिटी पाहिली तर दोन-तीन तालुक्यांच्या पुढे जात नाही. नाही म्हणायला त्यांची संपर्क कार्यालये विविध ठिकाणी आहेत, परंतु ती जास्त करून शोभेची वस्तूच आहेत. त्या ठिकाणी प्रतापराव कधी भेटतील, याचा कधीही नेम नसतो. या सर्व प्रकारामुळे गेल्या अनेक वर्षांपासून भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते प्रतापरावांवर चांगलेच नाराज होते. परंतु केवळ युतीचा धर्म म्हणून सगळे मुकाटपणे प्रतापरावांचे कार्य करायचे. भाजपचे कार्यकर्ते हे निष्ठेने काम करणारे असल्यामुळे त्यांचे लक्ष प्रतापरावांऐवजी नरेंद्र मोदी यांच्याकडेच गेल्या दहा वर्षांपासून होते. परंतु शेवटी आता भाजप पदाधिकारी कार्यकर्त्यांचा धीर सुटला आहे. त्यांना आता जिल्ह्याचा विकास करणारा हक्काचा माणूस हवा आहे. भाजपकडे नाही म्हटले तरी दोन-चार चांगले चेहरे हे लोकसभेसाठी समोर आहेत. परंतु जिल्हाभर त्यांची कनेक्टिव्हिटी नाही. दोन-चार तालुक्यांपुरते त्यांचे चांगले काम आहे. त्यामुळेच संपूर्ण जिल्हाभर ज्याचा नेहमी विकासाचा चेहरा आहे, असा चेहरा भाजपला हवा असल्या कारणाने राधेश्याम चांडक यांचे नाव गेल्या काही दिवसांपासून जोरदार चर्चेत आहे.

**भाग-3**

राधेश्याम चांडक यांचे बुलढाणा अर्बनच्या माध्यमातून मोठे संपर्क जाळे तयार झालेले आहे. सहकार क्षेत्रात त्यांचे चांगले काम आहे. सहकाराच्या माध्यमातून त्यांनी आजवर अनेक असाध्य गोष्टी साध्य करून दाखवल्या आहेत. शिवाय राधेश्याम चांडक ही अशी व्यक्ती आहे, ज्यांचा कोणताही स्वतंत्र गट नाही. भाजपच्या सर्व नेत्यांना व विविध गटांना चालतील असा हा चेहरा आहे. एकीकडे चांडक यांचे नाव सहकार क्षेत्रात सन्मानाने घेतले जाते, तर दुसरीकडे विद्यमान केंद्रीय गृहमंत्री व भाजपचे चाणक्य म्हणवले जाणारे अमित शाह यांच्याकडे केंद्रीय सहकार खाते देखील आहे. त्यामुळे सहकाराचा हा धागा या दोन व्यक्तींमध्ये गेल्या काही काळात चांगलाच घट्ट झाला आहे. या स्थितीत भाईजींचे नाव उमेदवारीसाठी समोर आले, तर त्यांच्यासमोर विरोधकांकडून दुसरा कोणताही तगडा चेहरा दिसणार नाही. पर्यायाने भाईजींना व भाजपला ही निवडणूक जिंकणे अधिक सोयीचे होईल. तसेच प्रतापराव नावाची भाजपची डोकेदुखी कायमची जाईल. या भूमिकेतूनच भाजपचे कार्यकर्ते सध्या याबाबत जोरदार चर्चा करीत आहेत. शिवाय भाजपशी निगडित लोकांच्या ग्रुपवर याबाबत जोरदार वाच्यता होत आहे. राधेश्याम चांडक यांची खासदारकी ही जिल्ह्याच्या विकासालाही नक्कीच पोषक ठरू शकते. केंद्रीय निधी जास्तीत जास्त जिल्ह्यासाठी आणण्यावर त्यांचा अधिक भर राहू शकतो. जो व्यक्ती कोणतेही राजकीय पद नसताना विकासाची विविध कामे करू शकतो, तर सत्तेत पोहोचल्यानंतर निश्चितच विकासाची नवी पहाट जिल्ह्यात उगवू शकते.

**जिल्ह्यातील सुज्ञ नागरिकांना बुलडाणा अर्बन परिवाराविषयी आपलं पण असल्याने तसेच प्रत्येक सामाजिक उपक्रमात अव्वल असलेले नाव राधेश्याम चांडक यांचे परिचय हे जिल्ह्यातील घराघरात आहे.**

### बुलडाणा अर्बन संस्थापक अध्यक्ष राधेशाम चांडक यांनी पत्रकारांना माहिती दिली...

**लोकसभा २०२४ निवडणूक विषयी बुलढाणा अर्बनचे सर्वेसर्वा राधेश्याम चांडक उर्फ भाईजी यांना पत्रकारांनी त्यांच्या संभावित उमेदवारीबाबत विचारले असता, भाईजी बोलले की, मी तिकीट मागणार नाही. भाजपने जबाबदारी दिल्यास नक्कीच निवडणूक लढवीन. पक्षाने दिलेल्या आदेशाचा पालन करून ही निवडणूक जिंकण्याचा पुरेपूर प्रयत्न करेन. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ४०० पार चे स्वप्न राधेश्याम चांडक यांच्या विजया स्वरूपात पूर्ण होईल व मोदींच्या गळ्यातील ४०० खासदारांच्या विजयाचा पहिला हार हा बुलडाणा जिल्ह्याचाच राहील, असा विश्वास भाईजींनी व्यक्त केला.**

---

## मलकापूर येथील तरुणाचा पूर्णेच्या पात्रात बुडून मृत्यू

जनसंचलन/मलकापूर

येथील सालीपुरा भागातील १८ वर्षीय तरुणाचा पूर्णेच्या पात्रात बुडून मृत्यू झाल्याची घटना जळगाव खान्देशातील कोथळी येथील मुक्ताबाई मंदिराजीक १० मार्च रोजी सायंकाळी घडली. ११ मार्च रोजी सकाळी तरुणाचा मृतदेह आढळला. मलकापूर येथील सालीपुरा भागातील रहिवासी गोकुळ दारासिंग राजपूत (वय १८ वर्षे) इयत्ता १२ वी चा विद्यार्थी होता. १० मार्च रोजी गोकूळ राजपूत सहकारी मित्रांसोबत देवदर्शनासाठी गेला होता. सायंकाळी मुक्ताईनगर तालुक्यातील कोथळी येथील मुक्ताबाईच्या दर्शनानंतर तो पूर्णा नदीवर पोहोचला. सायंकाळी ६ सुमारास गोकुळ दारासिंग राजपूत हा हिरवळीवरून पाय घसरून पूर्णे



च्या पात्रात पडला. त्यामुळे नदीच्या काठावर उभे असलेल्या लोकांनी व सहकारी तरुणांनी आरडाओरडा केली. पण तोवर गोकुळ पाण्यात बुडाला. या घटनेत काहींनी गोताखोरांना पाचारण केले. मात्र, अंधार पडल्याने शोधमोहीम थांबविण्यात आली. सोमवारी सकाळी माजी नगराध्यक्ष ॲड हरीश रावळ सहकाऱ्यांसह घटनास्थळी दाखल झाले होते.

## औद्योगिक क्षेत्रात १ हजार १८१ उद्योजकांना जमिनी वाटप...



जनसंचलन /बुलढाणा

औद्योगिक क्षेत्रात १ हजार १८१ उद्योजकांना जमिनी वाटप करण्यात आल्या आहेत. जागा घेताना उद्योजकांनी गांभिर्यपूर्वक उद्योग सुरू करावे. घेतलेले कर्ज परतफेड होईल, याची दक्षता घ्यावी. उद्योग विकासाला पूरक वातावरण होण्यासाठी चेंबर ऑफ कॉमर्स स्थापन करण्यात यावे. यातून उद्योजकांना फायदा होण्यास मदत मिळेल. परिषदेत श्री. चांडक यांनी उद्योजकांच्या शासनाकडून असलेल्या अपेक्षा सांगितल्या. श्री. पोटे यांनी प्रदूषण नियंत्रण मंडळाची माहिती दिली. श्री. इंगळे यांनी बचतगटांच्या माध्यमातून करण्यात येत असलेल्या उपक्रमांची माहिती दिली. इश्वेद बायोटेकचे संजय वायळ यांनी उद्योगाविषयी माहिती दिली. सुनील पाटील यांनी उद्योग केंद्रामार्फत राबविण्यात येत असलेल्या योजनांची माहिती दिली.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# एक फुल दोन हाफ सरकार शेतकऱ्यांना न्याय देऊ शकत नाही, लुटारुंच्या विरुद्ध मैदानात उतरलोय : उद्धव ठाकरे

वृत्तसंस्था/यवतमाळ

एक फुल दोन हाफच राज्य सरकार शेतकऱ्यांना न्याय देऊ शकत नाही. यवतमाळ जिल्ह्यात येऊन मोदींनी आश्वासन दिले त्याचे काय झाले. निवडणुकीच्या तोंडावर मोदी इथे येतात. त्यांच्या हाती नाही तर त्यांचे नशीब तुमच्या हाती आहे. शेतकऱ्याचं उत्पन्न दुप्पट करणार होते. इथे शेतकऱ्याच्या आत्महत्या वाढल्या आहेत. शेतमालाला बाजारभाव नाही. एक उद्योग यांनी यवतमाळमध्ये आणला नाही. या गद्दारांना धडा शिकवायचा आहे. त्याकरीता तुमच्या विश्वासावर या लुटारुंच्या विरुद्ध मैदानात उतरलो आहे, असा घणाघात शिवसेना (उबाठा) प्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांनी केला.जनसंवाद मेळाव्यात प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. यावेळी मंचावर विरोधीपक्ष नेते अंबादास दानवे, किशोर तिवारी, संजय देशमुख आदी सह शिव-सेना (उबाठा) पदाधिकारी उपस्थित होते. हजारो नागरिकांच्या उपस्थितीत त्यांनी राज्य आणि केंद्र सरकारवर सडकून टीका केली. गांधी लेआ-उट मैदान येथे हा जनसंवाद मेळावा घेण्यात आला. राळेगाव, पांढरंकवडा, बाभुळगाव येथील पदाधिकाऱ्यांनी शिवसेना पक्षात प्रवेश केला. यावेळी अंबादास दानवे यांनी देखील शिंदे सरकार आणि मोदी सरकारवर टीका केली.उद्धव ठाकरे म्हणाले की, आता उन तापायला लागलं आहे. आपल्याला गद्दारांना उन्हात आणायचं आहे. इथल्या शेतकऱ्यांची घे माय धरणी ठाय अशी अवस्था झालेली असताना याची यांना पर्वा नाही. मुख्यमंत्री झाल्याबरोबर राज्य शेतकरी आत्महत्यामुक्त करीन म्हणणारे शिंदे एक वर्षात राज्यात ४ हजार ७५६ शेतकरी आत्महत्या झाल्या तरी एक शब्द बोलत नाही. इथले पालकमंत्री स्वतःचा स्वार्थ पाहतात, अशी टीका त्यांनी केली. संजय देशमुख यांनी शेतकऱ्यांच्या, कष्टकऱ्यांच्या प्रश्नवर भाष्य केले. यावेळी राळेगाव विधानसभा मतदार संघातील महिला-पुरुष यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. उन्हाची तीव्रता असतानाही नागरिकांची गर्दी लक्ष वेधून घेत होती.



# जिल्हाधिकारी कार्यालयापुढे विविध सामाजिक संघटनांची निदर्शने...

जनसंचलन/बुलढाणा

अलीकडे संविधान विरोधी वक्तव्य वारंवार केली जात आहे. संविधानामुळे आपला देश अबाधित आहे. सर्व जाती धर्म एका चौकटीत बांधण्याच काम संविधानाने केले आहे. असे असले तरी भाजपचे खासदार अनंत हेगडे यांनी संविधानात बदल करण्यासाठी भाजपला बहुमत द्या, अशा पद्धतीच वादग्रस्त वक्तव्य केले. संविधान बदल करू म्हणण-ारे हे वक्तव्य लोकशाही विरोधी असून असे वक्तव्य करणाऱ्यास कठोर शासन करावे, असे वक्तव्य कदापि खपवून घेतले जाणार नाही, असे प्रतिपादन जिल्हा काँग्रेसचे सरचिटणीस व सामाजिक कार्यकर्ते सुनील सपकाळ यांनी केले. खासदार आनंत हेगडे यांनी केलेल्या वक्तव्याच्या निषेधार्थ आज १२ मार्च रोजी जिल्हाधिकारी कार्यालयापुढे विविध सामाजिक संघटनांचे वतीने निदर्शने करण्यात आली. यावेळी ते बोलत होते.

कर्नाटकातील उत्तरा कन्नड जिल्ह्याचे खासदार आनंत हेगडे यांनी संविधान दुरुस्तीसाठी दोन तृतीयांश मतदान आवश्यक आहे. यासाठी भारतीय जनता पार्टीला बहुमताने विजयी करा अशा पद्धतीचे वक्तव्य केले. संविधान बदलाची त्यांची भाष्या देशहिता विरोधी आहे. संविधान बदलणे हे काही देश विघातक शक्तींचे प्रयत्न आहेत. अशा पद्धती-चे वक्तव्य काही लोक वारंवार करत आले आहेत, व त्यांना पाठबळ सुद्धा दिल्या जात आहे. अशी वक्तव्य करणाऱ्या खासदार अनंत हेगडेंवर कठोर कारवाई करण्याची मागणी सुनील सपकाळ यांनी केली. यावेळी जिल्हाधिकारी यांच्या मार्फत राष्ट्रपती यांना निवेदन देण्यात आले. यावेळी सुनील सपकाळ, एडवोकेट विजय सावळे, डॉक्टर पुरुष-ोत्तम देवकर, एडवोकेट नंदू भाऊ साखरे आदींची उपस्थिती होती.


